# कोण कोठे राहतो ?





आपण घरात राहतो. घर मोठे असेल किंवा लहान पण त्याला भिंती असतात. छप्पर असते. खिडक्या असतात. घरात राहिले म्हणजे ऊन लागत नाही. पाऊस लागत नाही. उघड्यावर राहण्यापेक्षा घरात राहिले की बरे असते.

आपल्याला घर असते तसे प्राण्यांना असते का? प्राणी कोठे राहतात?

प्रकाशक : विद्याभारती / इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे ४११०२९

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४०० ००५,

उंदीर बिळात राहतात. खेकडे बिळात राहतात; उंदीर आणि खेकडा बीळ तयार करतात.

बिळात त्यांना ऊन लागत नाही. आपण त्यांना पकडू लागलो तर ते बिळात लपतात.





चिमणी, कावळा, कबुतर घरट्यात राहतात. काटक्या, पेंढा, पिसे जमवून घरटे बांधतात. घरट्यात अंडी घालतात, पिल्ले वाढवितात.



मुंग्या वारुळात राहतात.
मधमाशा पोळ्यात राहतात.
हे प्राणी लहान असतात.
पण ते आपले घर बनवितात.
घरात अन्न साठवितात.
अंडी घालतात. पिल्ले वाढवितात.

माणूस, उंदीर, चिमणी, कावळा, खेकडा, मुंग्या, मधमाशा घर बनवितात. घरात राहतात.

सगळे प्राणी घरात राहतात का ?

ज्यांना राहण्यासाठी घर लागत नाही असे प्राणी तुम्हाला माहीत आहेत का ? आठवा पाहू.

ज्यांना राहायला घर लागत नाही अशा तीन प्राण्यांची नावे लिहा.

ह्या घरामध्ये कोण राहते ?







१)

२)

३)

घरटे बनविण्यासाठी चिमणी कोणते सामान वापरते ?

घर बांधण्यासाठी माणसाला कोणते सामान लागते ?